सत्यमेव जयते
महाराष्ट्र वनविभाग
**संचालक बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र, चिचपल्ली यांचे कार्यालय**
(स्थित-चंद्रपूर ) आकाशवाणी जवळ, बंगला नं. २८, चंद्रपूर-४४२४०१ ( महाराष्ट्र )
दूरध्वनी क्र.- ०७१७२ २७२९९९ E-mail :- directorbrtc@mahaforest.gov.in

जावक क्रमांक कक्ष-5/प्रशिक्षण/721 /2023-24 दिनांक:- 12/12/2023

# जाहिरात
## 30 दिवसीय बांबू फर्निचर प्रशिक्षण

बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र चिचपल्ली अंतर्गत 100% शासकीय अनुदानातून **"30 दिवसीय निवासी बांबू फर्निचर प्रशिक्षण"** साठी बांबू फर्निचर क्षेत्रातील विविध कारागिरांकडून व बांबू फर्निचरबाबत आवड असलेल्या उमेदवारांकडून विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहे.

| **प्रशिक्षणाचे नाव** | **कालावधी** | **प्रवेश क्षमता** |
|---|---|---|
| "बांबू फर्निचर प्रशिक्षण" | 30 दिवस (03 जानेवारी 2024 ते 03 फेब्रुवारी 2024) | 20 |

- **पात्रता** -: इयता 10 वी (एस.एस.सी.) उत्तीर्ण
- **बांबू फर्निचर क्षेत्राची आवड व अनुभव**
- प्रवेश अर्ज करणे -: दि.15/12/2023 पासून सुरु
- अर्ज सादर करण्याची शेवटची तारीख. -: दि.31/12/2023 साय.5.30 वाजेपर्यंत, उमेदवारास अर्ज पोस्टाने किंवा स्वतः कार्यालयात येऊन सादर करता येईल. (शासकिय सुट्टीचे दिवस वगळून-आवश्यक कागदपत्रांसह)

**सूचना /अटी व शर्ती :-** 1) उमेदवाराचे वय 18 ते 40 वर्ष या वयोगटातील असावे व तो महाराष्ट्रातील रहिवासी असावा.
2) उमेदवाराने शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र, आधारकार्ड इत्यादी दस्ताऐवज अर्जासोबत जोडण्यात यावे. अर्जाचा नमुना या कार्यालयाच्या www.brtc.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून तो संकेतस्थळावरून डाऊनलोड करावा.
3) विहित केलेल्या कालावधीत अर्ज प्राप्त न झाल्यास उमेदवाराचा प्रशिक्षणासाठी विचार करण्यात येणार नाही.
4) उमेदवाराची निवड करताना त्यांची बांबू फर्निचर क्षेत्रातील आवड व त्यांचा कल तसेच अनुभव यास प्राधान्य देण्यात येईल, त्याबाबतचे सक्षम दस्ताऐवज अर्जसोबत जोडण्यात यावे.
5) 20 पेक्षा जास्त अर्ज आल्यास दि.02/01/2024 रोजी कौशल्य क्षमता चाचणी BRTC कार्यशाळा, वनअकादमी चंद्रपूर येथे आयोजित करण्यात येईल. यामध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांना प्रशिक्षणाचा लाभ देण्यात येईल. कौशल्य क्षमता चाचणी ही फर्निचर क्षेत्रातील प्राथमिक कौशल्य क्षमतेवर आधारित राहील.
6) प्रशिक्षणा अंतर्गत उमेदवार निवड प्रक्रिया, कालावधी प्रशिक्षणासंबंधी सर्व अधिकार संचालक BRTC यांचेकडे राखून ठेवण्यात येत आहे. अधिकच्या माहितीसाठी खालील कार्यालयीन पत्यावर संपर्क करावा.

**कार्यालयाचा पत्ता :-**

संचालक, बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र चिचपल्ली (स्थित-चंद्रपूर)
बंगला नं 28, सिव्हील लाईन, आकाशवाणीजवळ, चंद्रपूर-442401,
दूरध्वनी क्र. 8799821723, 9158508275, 8208177912
संकेतस्थळ:- www.brtc.org.in

# सचिव बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र संस्था चिचपल्ली

( स्थित- चंद्रपूर)

(30 दिवसीय बांबू फर्निचर प्रशिक्षणाकरिता अर्ज)

## अर्जाचा नमुना

फोटो

**प्रति,**

**मा. सचिव,**
**बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र संस्था, चिचपल्ली**
**(स्थित- चंद्रपूर)**

1. **अर्जदाराचे नाव** :- ____________________
2. **अर्जदाराचा पूर्ण पत्ता** :- ____________________
3. **जन्म तारीख** :- ______________-________
4. **जात व प्रवर्ग** :- ____________________
5. **फोन/मोबाईल क्रमांक** :- ____________________
6. **ई-मेल आयडी (असल्यास)** :- ____________________
7. **शैक्षणिक अहर्ता** :- ____________________

| अनु. क्र. | परीक्षेचे नाव | एकूण गुण | प्राप्त गुण | टक्केवारी/ग्रेड | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 1. | | | | | |
| 2. | | | | | |
| 3. | | | | | |
| 4. | | | | | |
| 5. | | | | | |

8. **अनुभव (असल्यास):-** ____________________
____________________
____________________

वर दिलेली माहिती सत्य आहे. खोटी आढळल्यास मी कार्यवाहीस पात्र राहील. सदरचे प्रशिक्षण हे कौशल्य विकासासाठी असून प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र व इतर तत्सम संस्थामध्ये नोकरीचा हक्क प्रस्थापित होत नाही याची मला जाणीव आहे व त्याचे मी पालन करेन.

**दिनांक :-**

**(अर्जदाराची सही)**

**टीप :- अर्जासोबत खालील दस्ताऐवजाच्या छायांकित प्रती जोडणे आवश्यक आहे.**

1) **शैक्षणिक अहर्ता (गुणपत्रिका)**
2) **पासपोर्ट साईज फोटो-2**
3) **आधार कार्ड**
4) **अनुभवासंदर्भात आवश्यक दस्ताऐवज.**

**वरील सर्व प्रमाणपत्र स्वत: प्रमाणित करून घ्यावे.**